दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २११ । शुक्रवार १५ मे २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या २५ गोवंशीय जनावरांची सुटका

### एलसीबीची राहुरी येथे कारवाई । पाचशे किलो गोमांस जप्त



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या २५ गोवंशीय जनावरांची स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने सुटका केली आहे. या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक १५ मे रोजी सकाळी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक राहुरी हद्दीमध्ये पेट्रोलिंग करत असताना गोपनीय माहिती मिळाली की, राहुरी शहरात खाटीक गल्ली येथे पत्र्याच्या शेडमध्ये गोवंशीय जनावरे कत्तल करण्याच्या उद्देशाने निर्दयतेने बांधून ठेवली आहेत. त्यानुसार पथकाने तात्काळ खात्री केली असता, त्या ठिकाणी गोवंशीय जीवंत जनावरे चारा-पाण्याविना निर्दयतेने बांधुन ठेवल्याचे दिसून आले. ही जनावरे अन्सार कुरेशी व वसीम कुरेशी यांची असल्याचे निष्पन्न झाले.

पथकाने या ठिकाणावरुन १ लाख ६२ हजार रुपये किमतीची २५ जीवंत गोवंशीय जनावरे, एक लाख रुपये किमतीचे पाचशे किलो गोमांस, दोन लाख रुपये किमतीचे एक छोटा हत्ती टेम्पो वाहन असा एकूण ४ लाख ६२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

आरोपीविरुध्द राहुरी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २७१,३२५,३(५) प्राणी संरक्षण अधिनियम कलम ५(ब), ५(क), ९ सह प्राण्यांना निर्दयतेने वागविण्याचे कलम ३, ११ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास राहुरी पोलीस ठाणे करीत आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच तपास पथकातील उपनिरीक्षक समीर अभंग, पोलीस अंमलदार लक्ष्मण खोकले, राहुल द्वारके, भीमराज खर्से, चालक चंद्रकांत कुसळकर यांच्या पथकाने केली.

**नागरिकांना आवाहन**

**अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये कोठेही अवैध धंदे सुरू असल्यास स्थानिक गुन्हे शाखेला फोन नंबर ०२४१-२४१६१११, डायल ११२ यावर माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.**

## बोगस बियाणे, खतांचा काळाबाजार करणाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल करा - पालकमंत्री

### जिल्हास्तरीय खरीप हंगामपूर्व नियोजन बैठक

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** केवळ परवाने निलंबित करण्यापुरती कारवाई न करता थेट फौजदारी गुन्हे दाखल करावेत. खतांचा काळाबाजार, सक्तीची जोडविक्री, निर्धारित दरापेक्षा अधिक दराने खत विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्या पीक विमा कंपन्यांवरही गुन्हे दाखल करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत, असे प्रतिपादन जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉक्टर राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय खरीप हंगामपूर्व नियोजन बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार अमोल खताळ, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, आमदार विक्रमसिंह पाचपुते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, आत्माचे प्रकल्प संचालक प्रदीप लाटे, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे संचालक डॉ. जी. के. ससाणे, सागर गायकवाड, किरण मोरे,डॉ. प्रशांत बोडके आदी उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार हेमंत ओगले, आमदार किरण लहामटे यांनी सहभाग घेतला.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, खरीप हंगामात खतांची कृत्रिम टंचाई निर्माण होणार नाही यासाठी प्रशासनाने काटेकोर नियोजन करावे. जिल्ह्यात खतांचा पुरेसा राखीव साठा उपलब्ध असून पारंपरिक युरिया व डीएपीला पर्याय म्हणून नॅनो युरिया व नॅनो डीएपीच्या वापरास प्रोत्साहन द्यावे. खत खरेदी-विक्री प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी 'क्यूआर' प्रणाली व इलेक्ट्रॉनिक विक्री यंत्रणा प्रभावीपणे राबविण्यात यावी. तसेच सर्व कृषी सेवा केंद्रांवर खतांचे दर व उपलब्ध साठा दर्शविणारे फलक लावणे बंधनकारक करण्यात यावे, असे निर्देश त्यांनी दिले.

सेंद्रिय व नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी कृषी विज्ञान केंद्रांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रशिक्षण द्यावे. उत्कृष्ट व नाविन्यपूर्ण शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना जिल्हा परिषदेमार्फत विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करावे, असेही त्यांनी सांगितले.

शेतमजुरांच्या उपलब्धतेचा आढावा घेऊन नोंदणीकृत मजुरांना प्रत्यक्ष शेतीच्या कामात सहभागी करून घ्यावे. निष्क्रिय मजुरांबाबत आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करावी, अशा सूचनाही त्यांनी प्रशासनाला दिल्या.

गावपातळीवर व्हॉट्सॲप गट तयार करून कृषी विभागाच्या योजना, हवामान अंदाज व ■ पान ४ वर

## कांद्याच्या दरासाठी राष्ट्रवादीचा रास्ता रोको

### टाकळी ढोकेश्वर येथे नगर-कल्याण महामार्ग ठप्प । सरकारला आंदोलन तीव्र करण्याचा इशारा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** कांद्याला मिळणाऱ्या अत्यल्प दरामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी गुरुवारी टाकळी ढोकेश्वर येथे नगर-कल्याण राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करत सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. राष्ट्रवादीचे नेते तथा नांदूर पठारचे सरपंच रवींद्र राजदेव यांच्या नेतृत्वाखाली आणि खासदार नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन करण्यात आले.

कांद्याला उत्पादन खर्चापेक्षाही कमी दर मिळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. कांद्याला तातडीने हमीभाव जाहीर करावा, निर्यातबंदी हटवावी, स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी लागू कराव्यात, थकीत वीजबिले माफ करावीत तसेच पीकविम्याचा लाभ तत्काळ द्यावा, अशा प्रमुख मागण्या यावेळी करण्यात आल्या. सरकारने शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्यास आगामी काळात आंदोलन अधिक उग्र स्वरूप धारण करेल,'' असा इशारा रवींद्र राजदेव यांनी यावेळी दिला.

आंदोलनामुळे नगर-कल्याण महामार्गावरील वाहतूक



काही काळ पूर्णपणे ठप्प झाली होती. महामार्गाच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पारनेर पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला होता. प्रशासनाकडून आंदोलनकर्त्यांशी चर्चा करण्यात आल्यानंतर मागण्यांचे निवेदन स्वीकारण्यात आले. त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले आणि वाहतूक पूर्ववत करण्यात आली. ■ पान ४ वर

## सामाजिक बांधिलकीतून धर्मवीरांना मानाचा मुजरा

### अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशनचा जयंतीनिमित्त प्रेरणादायी सेवा उपक्रम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** स्वराज्यासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन, अहिल्यानगर यांच्या वतीने अत्यंत भावपूर्ण आणि प्रेरणादायी अभिवादन कार्यक्रम पार पडला. ''मराठ्यांची निस्वार्थ चळवळ'' म्हणून ओळख असलेल्या या फाउंडेशनने पुन्हा एकदा सामाजिक बांधिलकीची जाणीव करून दिली.

संभाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत त्यांच्या शौर्य, अदम्य जिद्द आणि धर्मरक्षणासाठी दिलेल्या सर्वोच्च बलिदानास अभिवादन करण्यात आले. घोषणांनी परिसर दुमदुमून गेला आणि प्रत्येकाच्या हृदयात अभिमानाची ज्योत प्रज्वलित झाली. वातावरणात श्रद्धा, स्वाभिमान आणि देशभक्तीचा ओलावा जाणवत होता.

इतिहासाला वंदन करतानाच समाजसेवेची



परंपरा जपत, कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या सर्व शिवप्रेमींना फाउंडेशनच्या वतीने चहा वाटप करण्यात आले. ''शिवभक्तांची सेवा हीच महाराजांना खरी मानवंदना'' या उदात्त भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. सेवा आणि संस्कार यांचा सुंदर संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला.

यावेळी अहिल्यानगर महापौर ज्योतीताई गाडे उपमहापौर धनंजय भैय्या जाधव नगरसेवक निखिल दादा वारे ■ पान ४ वर

## हे म्हणजे वराती मागून घोडं,

## आधी भूमिपूजन, नंतर कर्जाचा कटोरा घेऊन मनपा बँकांच्या दारात - किरण काळे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर मनपाने ११४.६९ कोटींच्या पाच व्यापारी संकुल प्रकल्पांसाठी तब्बल ८६.२६ कोटी कर्जातून उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे प्रशासनाच्या आर्थिक नियोजनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ज्या मनपाकडे स्वतःच्या उत्पन्नाचे ठोस नियोजन नाही, ती आता कोट्यवधींचे कर्ज घेऊन विकासाच्या नावाखाली भविष्यातील आर्थिक संकटाचे बीज पेरत असल्याची भीती, ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी व्यक्त केली आहे. नगरकरांना कर्जबाजारी करण्या ऐवजी बीओटी तत्त्वावर व्यापारी संकुले विकसित करावीत, अशी जाहीर मागणी ठाकरे शिवसेनेने केली आहे.

कर्ज उभारणीसाठी सर्वसाधारण सभे समोर विषय चर्चेला असताना व मनपाने जाहिरात प्रसारित केल्या नंतर ठाकरे शिवसेना आक्रमक झाली आहे. काळे म्हणाले, नेहरू मार्केट, सर्जेपुरा रंगभवन, प्रोफेसर कॉलनी चौक, जुने एनसीसी कार्यालय आणि गंज बाजार येथील व्यापारी संकुलांसाठी जवळपास ८६.२६ कोटी रुपयांच्या कर्जाचा घाट घातला जात आहे. १५ मे च्या सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेवर हे विषय ठेवण्यात आले आहेत. मात्र हे होण्या आधीच यासाठी १३ मे रोजी मनपाने बँकां कडून प्रस्ताव मागणाऱ्या जाहिराती प्रसारित केल्या आहेत. हे म्हणजे, ''आंधळं दळतंय, कुत्र पीठ खातयं'' अशी मनपाची अवस्था झाली आहे. विशेष म्हणजे, नेहरू मार्केट प्रकल्पासाठी स्थानिक नेतृत्वाच्या प्रयत्नातून निधी उपलब्ध झाल्याचा आव मनपा कडून आणला



गेला. मागील आठवड्यात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हातून भूमिपूजनाचा मेगा इव्हेंट करत मोठा गाजावाजा करण्यात आला.

भूमिपूजन स्थळी ९.३४ कोटी रुपयांचा निधी आणल्याबद्दल भाजप-राष्ट्रवादीच्या नगरसेवकां कडून स्थानिक नेतृत्वाचे आभार मानणारी फ्लेक्स बाजी करण्यात आली. मात्र भूमिपूजना नंतर आता मनपालाच त्याच प्रकल्पांसाठी हातात कटोरा घेऊन बँकांकडे कर्ज मागावे लागत असल्याने त्या सर्व दाव्यांचे बिंग फुटले आहे. ''हे म्हणजे वराती मागून घोडं आणण्या सारखंच आहे,'' असा टोला काळे यांनी लगावला आहे. पालकमंत्री ज्येष्ठ व अत्यंत अनुभवी नेते आहेत. मात्र मनपाने मुख्यमंत्र्या नंतर आता पालकमंत्र्यांना ही खोटं ठरवलं आहे, अशी खोचक टिपणी काळेंनी केली आहे.



**''घरात नाही दाणा आणि मला बाजीराव म्हणा'' :**
मनपाच्या जाहिरातीनुसार एकूण ११४.६९ कोटींपैकी ८६.२६ कोटी कर्ज आणि उर्वरित २८.४३ कोटी मनपाचा स्वहिस्सा असणार आहे. मात्र स्वहिस्स्याची रक्कम उभारण्याची आर्थिक क्षमता मनपाकडे आज घडीला नाही. ''घरात नाही दाणा आणि मला बाजीराव म्हणा'' अशीच मनपाची अवस्था झाली असल्याची टीका काळे यांनी केली. शहराला कर्जबाजारी करणारे चुकीचे आर्थिक सल्ले देणारा, दबाव आणणारा तो तज्ञ कोण आहे, याचा शोध आम्हाला घ्यावा लागेल, असा इशारा त्यांनी दिला आहे. कालच सेवानिवृत्त मनपा कर्मचाऱ्यांनी थकीत वेतन मिळाव, सहाव्या वेतन आयोगातील थकीत नऊ हप्ते मिळावेत यासाठी मनपात तीव्र आंदोलन केलं. आर्थिक अडचणीचे असे शेकडो विषय मनपा दरबारी घोंगावत आहेत. मनपाने ते आधी सोडवावेत, असा सल्ला काळेंनी दिला आहे.

**बाजारपेठेची ही स्थिती लक्षात घेणार आहात की नाही ? :**
या प्रकल्पांचे संपूर्ण आर्थिक गणित भविष्यातील गाळे विक्री, ई-लिलाव, नॉन-रिफंडेबल डिपॉझिट आणि भाडे वसुलीवर आधारित आहे. म्हणजेच ''उत्पन्न होईल'' या अंदाजावर मनपा शहराच्या माथी शेकडो कोटींचा कर्जबोजा टाकण्याच्या तयारीत आहे. व्यापार क्षेत्रात आधीच मंदी, ऑनलाईन मार्केटचा वाढता प्रभाव आणि रिकाम्या व्यापारी गाळ्यांची संख्या वाढत असताना एवढ्या मोठ्या व्यापारी संकुलांना अपेक्षित प्रतिसाद मिळेल याची कोणतीही शाश्वती प्रशासन देऊ शकत नाही. उद्या गाळे विकले गेले नाहीत किंवा भाडेकरू मिळाले नाहीत, तर या कर्जाचा बोजा थेट नागरिकांच्या करांवर आणि मूलभूत सेवांवर पडणार असल्याचा इशारा किरण काळेंनी दिला आहे.

**मनपाचा 'उत्पन्नाचा स्रोत' की ३० वर्षांची आर्थिक बंदी? :**
गाळ्यांचा ई-लिलाव, ३० वर्षांच्या लीजवर 'नॉन-रिफंडेबल डिपॉझिट', मासिक भाडे यातून कर्जाची रक्कम फेडू. यातून मनपाला उत्पन्नाचा स्रोत निर्माण होईल, असे आयुक्त डांगे सांगत आहेत. आयुक्तांच्या म्हणण्याप्रमाणे जर पुढील ३० वर्ष मनपाला कोणतेही उत्पन्न मिळणार नसेल तर कर्जाचा धोका कशासाठी ? हा प्रकल्प राबवण्याचा मनपाचा अट्टाहास असेल तर तो बीओटी तत्त्वावरच पूर्ण करून घ्यावा. शहराला वेठीस धरू नये, असा सल्ला किरण काळेंनी ठाकरे शिवसेनेच्या वतीने दिला आहे.

**एकदाच नगरकरांना सांगून टाकावं :**
१००० कोटींचे कर्ज काढणार नसल्याचा सारवा सारव करणारा खुलासा मनपा आयुक्तांनी काल केला. त्यावेळी व्यापारी संकुलांसाठी कर्ज घेण्याबाबत त्यांनी काही एक सांगितल नव्हतं. मात्र कर्ज काढण्याची मालिका काही थांबायच नाव घ्यायला तयार नाही. नेमकं किती हजार कोटींचं कर्ज शहरावर करण्याचा विडा मनपा व सत्ताधाऱ्यांनी उचलला ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### ऑनलाईन निकालाचा गोंधळ; शिक्षक भारतीचा शासनाला आंदोलनाचा इशारा

अहिल्यानगर- शिक्षण विभागाने १० वी आणि १२ वीचे ऑनलाईन निकाल जाहीर करून कौतुक मिळवले असले, तरी प्रत्यक्षात मूळ गुणपत्रके (ऑफलाईन रिझल्ट) न मिळाल्याने राज्यभरात प्रवेश प्रक्रियेचा बोजवारा उडाला आहे. दुसरीकडे, तीव्र उष्णतेच्या लाटेत शिक्षकांना विद्यार्थी शोध मोहिमेसाठी सक्तीने रस्त्यावर उतरवले जात असल्याने शिक्षकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर, शिक्षक भारती संघटनेने मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांना कायदेशीर निवेदन देऊन प्रशासकीय धोरणांचा जाहीर निषेध केला आहे. ऑनलाईन निकाल जाहीर होऊनही विद्यार्थ्यांना अद्याप शाळा सोडल्याचे दाखले () आणि मूळ गुणपत्रके मिळालेली नाहीत. यामुळे महाविद्यालयीन प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे अपलोड करताना तांत्रिक अडचणी येत आहेत. मूळ कागदपत्रांच्या पडताळणीशिवाय प्रवेश निश्चित होऊ शकत नाही, तरीही प्रवेश प्रक्रिया रेटली जात असल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. जोपर्यंत ऑफलाईन निकाल मिळत नाही, तोपर्यंत प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रिया सुरू करू नये, अशी मागणी संघटनेने केली आहे. उष्णतेची लाट आणि मृत्यूचा सापळाशाळांची पटसंख्या टिकवण्यासाठी शिक्षकांना ऐन उन्हात विद्यार्थी शोध मोहिमेसाठी बाहेर पाठवले जात आहे. भद्रावती येथे याच मोहिमेदरम्यान आदर्श शिक्षक श्री. राजू हिवंज यांचा उष्माघाताने झालेला मृत्यू आणि मुंबईत बीएलओ कर्तव्यावर असताना अनेक शिक्षक आयसीयूमध्ये दाखल होण्याची घटना दै. वृत्तपत्रामधून समोर आली आहे. प्रतिकूल हवामानात अशा कामांची सक्ती करणे हे मानवी हक्कांचे आणि कायदेशीर तरतुदींचे उल्लंघन असल्याचे निवेदनात म्हटले आहे. शिक्षक भारती संघटनेचे पुणे विभाग कार्याध्यक्ष महेश पाडेकर यांनी ईमेल द्वारे मुख्यमंत्री शिक्षण मंत्री शिक्षण आयुक्त शिक्षण संचालक जिल्हाधिकारी यांना खालील निवेदनात मागण्या करण्यात आल्याविमा संरक्षणः निवडणूक, जनगणना किंवा शैक्षणिक मोहिमेवर असताना अपघात किंवा मृत्यू झाल्यास संबंधित शिक्षकाच्या कुटुंबाला ५० लाख रुपयांचे विमा कवच व वारसाला शासकीय नोकरी द्यावी.वैद्यकीय खर्चः कर्तव्यावर असताना आजारी पडणाऱ्या शिक्षकांचा १००% वैद्यकीय खर्च शासनाने उचलणे कायदेशीररित्या बंधनकारक करावे.सक्ती थांबवाः उष्णतेच्या लाटेचा विचार करून शिक्षकांना फिल्ड वर्कची सक्ती करू नये. या मागणीला आमदार कपिल पाटील,राज्य अध्यक्ष अशोक बेलसरे ,कार्याध्यक्ष सुभाष मोरे,विनाअनुदान कृती समिती राज्याध्यक्ष जयवंत भाबड, सचिव सुनील गाडगे,विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, महिला अध्यक्ष रूपालीताई बोरुडे,जिल्हा उपाध्यक्ष संजय तमनर, सचिन जासूद,दादासाहेब कदम, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे, संघटक चंद्रशेखर हासे,प्रवीण काळे,सहसचिव राहुल कानवडे ,तालुका अध्यक्ष सुमंत शिंदे, नरेंद्र लहिरे, साई थोरात,संपत वाळके,दिगंबर देसाई,सचिव वंदना जाधव,कल्पना चौधरी, मफीज इनामदार,दीपक फापाळे,गणपत धुमाळ,विजय पांडे, अमोल तळेकर,संतोष नवले,बाबासाहेब तांबे,अकील फकीर,बाबाजी लाळगे,वैभव चोथे,प्रवीण मालुंजकर,श्याम जगताप, आदींनी पाठिंबा दिला.

### सिंधुताई मगर यांचे निधन

अहिल्यानगर - सावेडीतील रेणावीकर शाळेसमोर



राहणार्या श्रीमती सिंधुताई मच्छिंद्र मगर (वय ७२) यांचे सोमवार दि. ११ मे रोजी पहाटे ५ वाजता अल्प आजाराने निधन झाले. येथील अमरधाममध्ये त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी वैद्यकीय, शैक्षणिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेकजण उपस्थित होते. श्रीमती सिंधुताई मगर या मूळच्या गोगलगाव (ता. राहाता) येथील रहिवासी होत्या. युनियन बँकेचे निवृत्त अधिकारी (स्व.) मच्छिंद्र मगर यांच्या त्या पत्नी तर सावेडीतील प्रसिद्ध दंत वैद्य डॉ. स्वरुपकुमार मगर यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्यामागे डॉ. स्वरुपकुमार मगर व इंजि. दीपक मगर ही दोन मुले तसेच वंदना दशरथ काळे व मनीषा संजय लोंढे या दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# अहिल्या नगर मधील दुय्यम निबंधक यांच्यावर चंद्रशेखर बावनकुळे कधी कारवाई करणार?

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना नितीन भुतारे यांनी निवेदन पाठवून केला सवाल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील दस्त नोंदणी कार्यालयात अनेक दिवसांपासून मोठा भ्रष्टाचार होत आहे तुकडे बंदी कायद्याचे उल्लंघन करून शेतजमिनीत गुंठेवारी करून दस्त नोंदणी सर्रास केली जात आहे. असा आरोप युवा नेते नितीन भुतारे यांनी केला आहे.

माहिती अधिकारात माहिती मागवून देखील अहिल्या नगर शहरातील तीनही दुय्यम निबंधक कार्यालयात अधिकारी माहिती देत नाही. मुद्रण जिल्हाधिकारी यांच्याकडे पुरावे देऊन सुनावणी घेऊन देखील कारवाई होत नाही त्यामुळे मुद्रांक जिल्हाधिकारी सुध्दा तुकडे बंदी गुंठेवारी दस्त नोंदणीत सहभागी आहेत त्यामुळे या सर्वा अधिकाऱ्यांवर कारवाई होणे गरजेचे आहे. दररोज लाखो रुपये भ्रष्टाचार करून कमविले जातात.

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काही दिवसांपूर्वी सांगितले होते तुकडे बंदी कायद्याचे कोणी उल्लंघन केले तर त्याच्यावर सर्जिकल स्ट्राईक करून कारवाई करू मग अहिल्या नगर शहरातील तीनही दुय्यम उपनिबंधक कार्यालयातील मागील एक वर्षाचे सर्व दस्तांची चौकशी करावी त्यामध्ये शेकडो दस्त तुकडे बंदी कायद्याचे उल्लंघन केल्याचे दिसून येतील. शेतजमिनीची गुंठेवारी झाल्याचे दिसेल त्यामुळे आपण या तीनही दुय्यम निबंधक अधिकारी व मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी केलेल्या मागील वर्षभराचे दस्त तपासून तुकडे बंदी कायद्याचे उल्लंघन करून शेतजमीन गुंठेवारी केल्याप्रकरणी कारवाई करावी अशी मागणी युवा नेते नितीन भुतारे यांनी मेल द्वारे निवेदन देऊन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना केली आहे.

# आधिक मासानिमित्त अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघाच्या वतीने भव्य ऋग्वेद स्वाहाकार व विष्णुयाग

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अधिक मासानिमित्त ऋग्वेद भुवन, चितळे रोड येथे अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघ संचलित महर्षी वेद विद्यालय च्या वतीने दि. १८ मे ते २२ मे दरम्यान भव्य ऋग्वेद स्वाहाकार व विष्णुयागाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक विधीत वेदघोष, मंत्रोच्चार, हवन व विविध वैदिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत. २२ मे रोजी दुपारी साडेबारा वाजता पूर्णाहूती करून महाप्रसादाने सांगता होईल.
या यागामध्ये सहभागी होण्यासाठी व यजमान म्हणून बसण्यासाठी भाविकांनी ९७६३०३२०३१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या धार्मिक कार्यक्रमास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पुण्यलाभ घ्यावा, असेही आयोजकांतर्फे सांगण्यात आले.

# सुशिक्षित युवकांनी व्यवसायाकडे वळावे – आमदार संग्राम जगताप

## साईराम वडेवाले यांच्या नवीन साईराम उडपी सेंटरचे उद्घाटन संपन्न



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**शहरामध्ये गेल्या २० वर्षापासून बटाटा वडे चा व्यवसाय करणारे संजय सकट यांनी आपल्या सुशिक्षित मुलासाठी जो आता बीबीएच्या तिसऱ्या वर्षाला आहे यासाठी नवीन व्यवसाय साईराम उडपी सेंटर सुरू करून दिला आहे याबद्दल मी त्यांचे कौतुक करतो असे प्रतिपादन आ संग्राम जगताप उद्घाटन प्रसंगी केले

यावेळी शिवसेना उबाठा उपजिल्हाप्रमुख गिरीश जाधव,जिप माजी सभापती बाळासाहेब हराळ,भाजपानेते दादासाहेब दरेकर,एड. शारदा लगड,अशोक पारधे,दि ना साठेअंबादास सकट,साहेबराव गोरखे, माणिकराव साळवे,दिनकर सकट,संजय सकट,धनराज सकट,ललिता सकट,संदीप पारधे,कोमल पारधे आदींसह अनेक मान्यवर,विविध क्षेत्रातील पदाधिकारी, व्यापारी वर्ग व नगरकर मोठ्या संख्येने उपस्थित होते

आमदार जगताप पुढे म्हणाले आज सुशिक्षित मुलं नोकरीचे मागे लागले आहेत पण आज गरीब परिस्थितीतून पुढे आलेला सकट परिवार यांनी अजून नवीन व्यवसायात पदार्पण केले आहे त्यांच्या व्यवसायाला माझ्याकडून व माझ्या कुटुंबीयांकडून शुभेच्छा

नवीन व्यवसायासाठी धनराज सकट यांनी प्रत्यक्ष उडपी सेंटरमध्ये काम करून इडली उत्तप्पा मेदुवडा मसाला डोसा समोसा याचे अद्ययावत प्रशिक्षण घेतले आहे,दिल्लीगेट सिद्धीबाग शेजारी येथे असलेल्या या उडपी सेंटर मध्ये प्रशस्त जागा असून कुटुंबासाठी बसण्यास ची चांगली व्यवस्था आहे

# थैलेसेमियाला धैर्याने तोंड देणाऱ्या मुलांचे आणि पालकांचे कौतुक वाटते - योगेश पैठणकर

## थॅलेसेमिया शिबीर अहिल्यानगरमध्ये संपन्न



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जागतिक थैलेसेमिया दिनाचे औचित्य साधून १२ मे २०२६ रोजी अहमदनगर आयुष रूग्णालय, तारकपूर गेड, अहिल्यानगर येथे त्रातुजा फाऊंडेशन, अहिल्यानगर, जिल्हा रूग्णालय अहिल्यानगर, सक्षम संस्था अहिल्यानगर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अहमदनगर, शांतिकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाऊंडेशन, अहिल्यानगर आयोजित थलेसेमिया रूग्णांसाठी आणि जनजागृती साठी विविध तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये थॅलेसेमिया रूग्णांची वार्षिक तपासणी, एच.एल. ए. टायपिंग नोंदणी, बोनमॅरो रजिस्ट्रेशन, रक्तदान, अवयव दान, थॅलेसेमिया मायनरची इलेक्ट्रोफोरोमिस तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

प्रास्ताविकात ऋतुजा फाऊंडेशनच्या सचिव तसेच सक्षमच्या प्राणदा प्रकोष्ठ प्रमुख अहिल्यानगर ॲड डॉ. अंजली केवळ यांनी विविध शिबीरांची माहिती दिली. तसेच दोन थॅलेसेमिया मायनर व्यक्तिंचे जर लग्न झाले तरच थैलेसमिया मेजर बाळ जन्माला येण्याची शक्यता प्रत्येक गर्भधारणेत २५ टक्के असते हे प्रमाण पंजाब, गुजरात आणि महाराष्ट्रामध्ये जास्त आहे. प्रत्येकाने लग्नाअगोदर थैलेसिमियाची तपासणी करणे आवश्यक आहे. अवयवदानाचे महत्त्व लाकांना पटवून देण्याची गरज आहे. ''जिते जिते रक्तदान जाते जाते नेत्रदान'' असे अवयवदानाचे महत्त्वच सांगितले. योगेश पैठणकर (सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहमदनगर) यांनी थैलेसेमियाला धैर्याने तोंड देणा-या मुलांचे आणि पालकांचे कौतुक वाटते आणि थैलेसेमिया योद्धयांसाठी असलेल्या दिव्यांगांच्या कायदयाविषयी माहिती दिली. आणि थैलेसेमिया योद्ध्यांचे कौतुक केले. डॉ.सुचेता यादव (अति. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रूग्णालय अहिल्यानगर) यांनी थैलेसेमिया रूग्णांमध्ये सतत रक्त घेऊन येणा-या अडचणींना कसे तोंड द्यावे हे सांगून उपस्थित रूग्ण आणि पालकांना थैलेसेमिया रूग्णांच्या सुकर आयुष्याचा मंत्र दिला. ऋतुजा फाऊंडेशनचे काम खूप चांगले चालू आहे. असेच काम पुढे चालू राहावे यासाठी उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. श्रीधर वापट (पश्चिम महाराष्ट्र प्रांत उपाध्यक्ष,सक्षम संस्था, अहिल्यानगर) यांनी सक्षम संस्था दिव्यांगांसाठी कसे काम करते ते सांगितले. दिव्यांगांना सक्षम बनविण्यासाठी विविध उपक्रमाची माहिती दिली.

डॉ राजीव चिटगोपीकर (अध्यक्ष, सक्षम संस्था, अहिल्यानगर) यांनी अशा शिबिराचे आयोजन ऋतुजा फाऊंडेशन करते त्यांचे कौतुक वाटते आणि दिव्यांग मित्र बनून दिव्यांगांसाठी मदतीचे आवाहन केले. समीर निकम (अध्यक्ष, थैलेसेमिया सोसायटी महाराष्ट्र, पुणे) यांनी दुर्गम भागातील थैलेसेमीया योद्ध्यांचे होणारे हाल विषद केले. शासनाने नोवल थेरेपीसाठी लागणा-या औषधांचा पुरवठा जर केला तर व-याच रूग्णांना रक्ताची गरज भासणार नाही आणि ते औषधांवरच बरे होऊ शकतील असे सांगितले. तसेच अहिल्यानगरमधील ऋतुजा फाऊंडेशनचे काम खूप चांगले चालू आहे. मूलगी ऋतुजा ज्या आजारातून बरी झाली त्या रूग्णांसाठी ऋतुजा फाऊंडेशनचे काम कौतुकास्पद असून आमचा आणि आमच्या संस्थेचा त्यांना कायम पाठिंबा असेल असे वक्तव्य त्यांनी केले.

तसेच डॉ. सोनाली बांगर (पमुख, आयुष रूग्णालय, अहिल्यानगर) थैलेसेमिया कसा टाळता येऊ शकतो ते सांगितले तसेच रूग्ण आणि पालकांशी संवाद साधला शांतिकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाऊंडेशन, अहिल्यानगरचे विश्वस्त नरेंदजी फिरोदिया सांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या हिमॅटोलॉजी डे केअर सेंटर, जिल्हा रूग्णालयाच्या वैद्यकिय अधिकारी डॉ.रूपाली कुलकर्णी यांनी जिल्हा रूग्णालयात उपलब्ध असलेल्या सुविधा विशद केल्या आणि रक्तदानाचे तसेच एच. एल. ए. टायपिंगचे महत्त्व लोकांना सांगितले. सक्षमच्या उपाध्यक्षा सौ. संध्या कुलकर्णी यांनी सक्षमने करत असलेल्या कामाचा आढावा सांगितला आणि सक्षम दिव्यांगांसाठी करत असलेल्या कामाचे महत्त्व सांगितले. श्रीमती भारती कुलकर्णी यांनी सक्षमन्ने संघटन मंत्र आणि सक्षमचे गीत म्हटले कार्यक्रमाची सांगता समापन मंत्राने झाली. शिबीराच्या यशस्वीतेसाठी जिल्हा रूग्णालय अहिल्यानगर, सक्षम संस्था अहिल्यानगर, शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरिअल फाऊंडेशन अहमदनगर, थैलेसीमीया सोसायटी महाराष्ट्र, पुणे, हिमॅटॉलॉजि डे केअर सेंटर, जिल्हा रुग्णालय आणि कर्मचारी,सुर्यकांत केवळ,महेश राहिंज, महेश केवळ, सक्षम माळुंके,अशोक तोडमल तसेच अहमदनगर नर्सिंग कॉलेजचे सर्व विद्यार्थी, कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. हिराबाई साळुंके, गौरव पठाडे, ॲड शेखर दरंदले उपस्थित होते. प्रास्ताविक सक्षमच्या प्राणदा प्रकोष्ठ प्रमुख आणि ऋतुजा फाऊंडेशनच्या संस्थापक सचिव डॉ ॲड अंजली केवळ, अध्यक्षीय सूचना डॉ. आशिष इग्मल यांनी तर सूत्रसंचालन मी वर्षा पाठक रोडे यांनी केले.आभार प्रदर्शन सक्षमचे कोषाध्यक्ष सुनिल जगदाळे यांनी केले.

# छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन; भिंगार येथील मराठा नागरी पतसंस्थेचा २२ वा वर्धापन दिन उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भिंगार येथील मराठा नागरी सहकारी पतसंस्थेचा २२ वा वर्धापन दिन तसेच धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या उपस्थितीत कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी उद्योजक अमोल गाडे, भिंगार बँकेचे चेअरमन अनिलराव झोडगे, पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन उदय अनभुले, संचालक सतिश इंगळे ,बाळकृष्ण काळे, लक्ष्मण सोनाळे, द्वारकाधीश राजे भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक वारकड, भिंगार शाखाध्यक्ष अच्युतराव गाडे, संजय सपकाळ, सचिन जाधव ,भाऊ कर्डिले, अर्जुनराव बेरड, ॲड. साहेबराव चौधरी, कोंडीराम वागस्कर, ॲड. शिल्पा बेरड, दीपमाला पवार, सुप्रिया मोरे, मनीष रोहकले आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या



पराक्रम, राष्ट्रनिष्ठा आणि धर्मरक्षणाच्या कार्याचा गौरव उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून केला. यावेळी सभागृहात ''जय जिजाऊ, जय शिवराय, जय संभाजी''च्या घोषणांनी वातावरण भारावून गेले होते.

उद्योजक अमोल गाडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ''छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्यासाठी दिलेले बलिदान हे प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांमधून राष्ट्रप्रेम, स्वाभिमान आणि संघर्षाची ऊर्जा मिळते. आजच्या तरुणांनी इतिहास समजून घेत समाजहितासाठी काम करण्याची गरज आहे.'' त्यांनी सहकार क्षेत्रातील संस्थांनी युवकांना रोजगार व आर्थिक स्थैर्य देण्यासाठी पुढाकार घ्यावा, असेही मत व्यक्त केले.

व्हाईस चेअरमन उदय अनभुले बोलताना म्हणाले, ''मराठा नागरिक सहकारी पतसंस्थेने गेल्या बावीस वर्षांत सर्वसामान्य नागरिकांचा विश्वास जपला आहे. ग्रामीण व शहरी भागातील छोट्या व्यावसायिकांना आर्थिक मदत देऊन अनेक कुटुंबांना उभारी देण्याचे कार्य या संस्थेने केले आहे. सहकार क्षेत्र केवळ आर्थिक व्यवहारापुरते मर्यादित नसून सामाजिक बांधिलकी जपणारे माध्यम आहे.''पतसंस्थेच्या २२ वर्षांच्या प्रवासाचा आढावा यावेळी घेण्यात आला. संस्थेच्या माध्यमातून विविध बचत योजना, कर्ज सुविधा आणि सामाजिक उपक्रम राबवून नागरिकांचा विश्वास संपादन करण्यात यश आल्याचे उदय अनभुले यांनी नमूद केले.

भिंगार बँकेचे चेअरमन अनिलराव झोडगे यांनी आपल्या मनोगतात पतसंस्थेच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, ''सहकार चळवळीमुळे सामान्य माणसाला आर्थिक आधार मिळाला आहे. मराठा नागरिक सहकारी पतसंस्थेने प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि विश्वास या तत्त्वांवर काम करत समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे. भविष्यातही संस्था अधिक सक्षमपणे कार्य करेल, असा विश्वास आहे.''

# अहिल्यानगर ज्युनियर बॉईज संघ आंतरजिल्हा फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेसाठी धुळे येथे रवाना



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा फुटबॉल असोसिएशन () यांच्या मान्यतेने अहिल्यानगर ज्युनियर बॉईज (अंडर-१५) फुटबॉल संघ हा आंतरजिल्हा फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धा २०२५-२६ (ज्युनियर बॉईज) मध्ये सहभागी होणार आहे. ही स्पर्धा दि. १२ मे ते १८ मे २०२६ दरम्यान शिरपूर, जि. धुळे येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धे साठी शुक्रवारी (दि.१५ मे) संघ रवाना झाला आहे.

गतवर्षीच्या स्पर्धेत अहिल्यानगर संघाने उल्लेखनीय कामगिरी करत चौथे स्थान पटकावले होते. त्याच कामगिरीच्या जोरावर यावर्षी संघ थेट उपांत्यपूर्व (क्वार्टर फायनल) फेरीतून आपल्या मोहिमेची सुरुवात करणार आहे. अहिल्यानगर संघाचा सामना शनिवारी (दि. १६ मे) सातारा व छत्रपती संभाजीनगर जिल्हा यांच्यातील विजेत्या संघाविरुद्ध होणार आहे.

या स्पर्धेसाठी निवड झालेल्या संघाचे अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालिद सय्यद, अमरजीतसिंग शाही, सचिव रोनप फर्नांडिस, सहसचिव प्रदीप जाधव व व्हिक्टर जोसेफ, खजिनदार रिशपाल सिंग परमार, सह खजिनदार रणबीर सिंग परमार तसेच कोअर कमिटी सदस्य राजू पाटोळे यांनी अभिनंदन करून संघास पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

संघाचे प्रशिक्षक जोनाथन जोसेफ तर संघ व्यवस्थापक जेव्हिअर स्वामी हे जबाबदारी सांभाळत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संघ उत्कृष्ट कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनतर्फे संपूर्ण संघाला स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

अहिल्यानगर ज्युनियर बॉईज (अंडर-१५) फुटबॉल संघ पुढीलप्रमाणे - अशोक चंद (कर्णधार), यदुवर कोकरे (उपकर्णधार), माहीर गुंदेचा, सौरभ खंडेलवाल, चिराग गोरे, ओम गाडे, ओम लोखंडे, इंद्रजित गायकवाड, कृष्णा भिसे, हर्षद सोनावणे, भार्गव पिंपळे, जय मुथा, गुणाध्य जाधव, आयुष गाडळकर, आदर्श साबळे, अंशुमन विधाते, देवांश झरेकर, मोक्ष गरदास, वीरेंद्र वीर, जोएल साठे.

# क्रूझरची दुचाकीला जोरदार धडक ; दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

## नाथ पेपर मिल फाट्याजवळील भीषण अपघात; परिसरात हळहळ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** भरधाव वेगाने जाणाऱ्या क्रूझर जीपने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना मंगळवारी पैठण-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील नाथ पेपर मिल फाट्याजवळ घडली. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. विष्णू अण्णा बोबडे (वय ६२, रा. बोहगाव ता. पैठण) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विष्णू बोबडे हे मंगळवारी सकाळी दुचाकीवरून पेट्रोल भरण्यासाठी नाथ पेपर मिल परिसरातील पेट्रोलपंपावर गेले होते. पेट्रोल भरून परत घरी जात असताना पैठणकडून छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या क्रूझर जीपने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.या अपघातात विष्णू बोबडे गंभीर जखमी होऊन रस्त्यावर कोसळले. परिसरातील नागरिकांनी तातडीने त्यांना उपचारासाठी पैठण येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले.

या प्रकरणी पैठण एमआयडीसी पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्वर जगदळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी करीत आहेत.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर- ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई-मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### दिल्लीगेटला आजपासून २ दिवसीय महिला व उद्योजकांचे प्रदर्शन



अहिल्यानगर- अधिक मासा निम्मित दिल्लीगेटला आजपासून दोन दिवस १६ व १७ मे रोजी प्रतिबिब संस्थेच्या वतीने अधिक मासा निम्मित महिला व उद्योजकता सक्षमीकरणासाठी शमी गणपती कार्यालय ,दिल्लीगेट ,अहिल्यानगर येथे सकाळी १० ते रात्री १० यावेळेत प्रदर्शन आयोजित केले असून त्यात शहरासह जिल्ह्यातील२५ महिलांचे स्टोल आहेतप्रदर्शनाचे उदघाटन दिनांक १६ रोजी सकाळी १० वा समाजसेविका व मा नगरसेविका शितलताई संग्राम भैय्या जगताप यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यानगर मनपाच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर ,उपसभापती वर्षा सानप, रेणुका महिला मंडळ च्या अध्यक्षा गायत्री कुलकर्णी उपस्थितीत होणार आहे दिनांक १६ व १७ मे २०२६ रोजी २ दिवसीय प्रदर्शन सर्वासाठी खुले असणार आहे,यामध्ये खरेदीसाठी कपडे,ज्वेलरी,कॉस्मेटिक,किड्स वेअर,फुड स्टॉल,नॅचरोपॅथी,आयुर्वेद,उन्हाळी वाळवण, गृहपयोगी वस्तू आदी बरेच काही स्टोल असणार आहेत.तरी सर्वानी उदघाटन कार्यक्रमास उपस्थित राहावे तसे एकदा तरी प्रदर्शनाला भेट द्यावी असे आवाहन संयोजिका अनुजा कांबळे,वनिता मानकर,जयश्री सूळ,ऋतुजा धोत्रे ,प्रिया भागवत आदींसह संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे तर स्टॉलची बुकिंग करण्यासाठी व अधिक माहितीसाठी ९२८४९३०६७४ या नंबर वर संपर्क साधावा.

### अल्ताफ सय्यद यांच्या मानवतेच्या कार्याला 'संत तुकडोजी महाराज समाजभूषण पुरस्कार' जाहीर



अहिल्यानगर- समाजात माणुसकीचा संदेश देत गेल्या दोन दशकांपासून निस्वार्थपणे सामाजिक कार्य करणारे मानवता हाच एक धर्म प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अल्ताफ सय्यद यांना यंदाचा 'संत तुकडोजी महाराज समाजभूषण पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, निमगाव वाघा (ता. नगर) येथे आयोजित सहाव्या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात त्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव होणार आहे. छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शनिवार, दि. १६ मे रोजी हे राज्यस्तरीय साहित्य संमेलन उत्साहात पार पडणार आहे. या संदर्भातील माहिती संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांनी दिली. अल्ताफ सय्यद हे मागील २० वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत असून, समाजातील वंचित, गरजू आणि दुर्बल घटकांसाठी सातत्याने काम करत आहेत. विशेषतः कोरोना महामारीच्या काळात त्यांनी केलेल्या कार्याची मोठी दखल घेतली गेली होती. शरद पवार विचार मंचच्या माध्यमातून त्यांनी अनेक गरजू कुटुंबांना अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू आणि आर्थिक मदत उपलब्ध करून दिली. कोरोना संकटाच्या पहिल्या लाटेपासून त्यांनी फ्रंटलाइन वर्कर्ससाठीही मोठे योगदान दिले. बुथ हॉस्पिटलला आवश्यक साहित्य पुरविणे, पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना एनर्जी ड्रिंक, मास्क, सॅनिटायझर आदी साहित्य देऊन त्यांना सहकार्य करण्यात आले. संकटकाळात अनेक गरजू नागरिकांसाठी त्यांनी मदतीचा हात पुढे केला होता. समाजात वाढत चाललेल्या जातीय आणि धार्मिक द्वेषाच्या पार्श्वभूमीवर 'मानवता हाच एक धर्म प्रतिष्ठान'ची स्थापना करून सय्यद यांनी समाजात ऐक्य, बंधुता आणि माणुसकीचा संदेश पोहोचविण्याचे कार्य सुरू केले. धर्म, जात, पंथ यापलीकडे जाऊन सर्वसामान्यांना आधार देण्याचा त्यांचा प्रयत्न सुरु आहे. गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शैक्षणिक मदत, साहित्य वाटप, मार्गदर्शन तसेच विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून ते सातत्याने कार्यरत आहेत. गरीब व होतकरू कुटुंबांना विविध प्रकारे मदत करून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे.

# दुसऱ्यांच्या जीवनात सुखाचे दिवस आणणारे अर्थ सेवेचे कार्य प्रशंसनीय – स्वामी गोविंदगिरी महाराज

## ॲविओथीक सर्विसेसच्या नव्या कार्यालयाचे उत्साहात उद्घाटन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** मनुष्य जीवनात अर्थाला खूप महत्व आहे. अर्थाने सगळं होतं असे नाही; पण अर्थ नसेलतर बरीच कामे अडतात. त्यामुळे अर्थाची उपेक्षा कोणीच कधीही करू नये. परिवार, समाज, राष्ट्र समृद्ध होण्यासाठी प्रत्येकाने लक्ष्मीची उपासना कायम करावी. आपल्या संस्कृती प्रमाणे सेवा हेच संस्कारांचे शिखर आहे. समाजाच्या सेवेच्या भावनेने आर्थिक क्षेत्रात योगदान देणारे गणेश झंवर व प्रीतेश दुगड यांचे काम कौतुकास्पद आहे. समाजात दुसऱ्याचे ओरबाडून खाण्याची वृत्ती निर्माण झालेली असताना सर्वसामन्यांची स्वतःची घरे व्हावी, त्यांचा व्यवसाय उभा राहावा यासाठी हे दोन युवक पुढे आली आहेत. दुसऱ्यांच्या जीवनात सुखाचे दिवस आणण्यासाठी होणारे अर्थ सेवेचे हे कार्य प्रशंसनीय असून ते अधिक बहरत जाओ. गणेश झंवर व प्रीतीश दुगड यांच्या सारखे युवक नगरमध्ये







असल्याचे सद्भग्य नगरकरांचे आहे, असे गौरवोद्गार अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंदगिरी महाराजांनी केले.

अहिल्यानगर मधील ॲविओथीक सर्विसेस एलएलपी या आर्थिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या संस्थेच्या आनंदधाम जवळील नव्या कार्यालयाचे उद्घाटन स्वामी गोविंदगिरी महाराजांच्या हस्ते नुकतेच झाले. यावेळी समर्थभक्त मंदारबुवा रामदासी महाराज, हभप गोविंद जाटदेवळेकर महाराज, महापौर ज्योती गाडे, ॲविओथीक सर्विसेसचे संचालक गणेश झंवर व प्रीतेश दुगड, श्रीनिवास झंवर, उद्योजक मोहन मानधना व नरेंद्र फिरोदिया, अमोल गाडे आदींसह झंवर व दुगड परिवार, विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात गणेश झंवर म्हणाले, नगरमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून उद्योग क्षेत्रात काम करताना लक्षात आले की, सर्वसामन्य नागरिकांना घरासाठी व व्यवसायासाठी बँकांकडून लहान मोठी कर्ज घेण्यासाठी मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी नागरिकांच्या वेळ व पैशाचे मोठ्याप्रमाणात अपव्यय होतो. यासाठी नागरिकांना पारदर्शीपणे सहकार्य करण्यासाठी ॲविओथीक सर्विसेस या आर्थिक संस्थेची स्थापना केली आहे. आज सर्वांच्या व महाराजांच्या आशीर्वादाने स्वतःच्या कार्यालयात या संस्थेचे स्थलांतर झाले आहे.

आभार मानताना प्रीतेश दुगड म्हणाले, प्रत्येकाला आपले स्वतःचे हक्काचे घर असावे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आमचा छोटासा प्रयत्न आहे. सर्वसामन्यांना सहज व पारदर्शीपणे कर्ज उपलब्ध व्हावे यासाठी ॲविओथीक सर्विसेस या आर्थिक संस्था काम करत आहे. या कामास गुरूदेवांचा आशीर्वाद लाभल्याने हे काम केवळ नगर पुरते सीमित न ठेवता हळूहळू पूर्ण राज्यात व नंतर देशात न्यायचे आहे.

# धर्मवीर संभाजी महाराज जयंतीच्या तेजस्वी पर्वावर

## रांधे येथे रक्तदान शिबिर, गुणवंतांचा गौरव





दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील रांधे (माळवाडी) येथील श्री स्वामी समर्थ देवस्थान परिसरात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंतीच्या पावन दिनी भक्ती, समाजसेवा आणि संस्कारांचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. स्वामी सेवेकरी परिवारातील सर्वात लहान सेवेकरी, स्वामिभक्त अनिल आवारी यांचे सुपुत्र तथा सर्वांचा लाडका ''शंभुबाळ'' अर्थात कु. शंभूराज अनिल आवारी यांच्या चौथ्या वाढदिवसानिमित्त आयोजित भव्य रक्तदान शिबिर, गुणवंत विद्यार्थी सन्मान सोहळा व महाप्रसाद कार्यक्रम अत्यंत उत्साहात व भक्तिमय वातावरणात पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांचे उपस्थित संपन्न झाला.

यावेळी धर्म, संस्कार आणि शिक्षण यांचा सुंदर मिलाफ घडवणारा हा कार्यक्रम उपस्थितांसाठी प्रेरणादायी होता, साईनाथ विद्यालय अळकुटी, धर्मनाथ विद्यालय जवळा, केदारेश्वर विद्यालय बाभुळवाडे, सुंदराबाई लंके विद्यालय वडझिरे तसेच शारदाबाई पवार विद्या निकेतन बारामती आदी विद्यालयांतील इयत्ता दहावीमध्ये ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या १६ गुणवंत विद्यार्थ्यांचा आमदार काशिनाथ दाते सर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

> **''शिक्षण आणि समाजकार्य या दोन्ही क्षेत्रांत युवकांनी पुढाकार घेतला पाहिजे,''भाविकांसाठी आवश्यक असलेल्या स्वच्छतागृहाच्या कामास लवकरच मंजुरी देण्यात येईल, ''हेच शंभुबाळाला वाढदिवसाचे खरे गिफ्ट ठरेल,''अळकुटी ते रांधे या सुमारे एक किलोमीटर रस्त्यासाठी रोजगार हमी योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून दिला आहे त्या रस्त्याचे कामही लवकरच सुरू होईल,**
>
> **आ. काशिनाथ दाते सर**
> **(विधानसभा सदस्य)**

पूना ब्लड सेंटरच्या वतीने किरण औटी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित रक्तदान शिबिरात युवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत रक्तदान केले. समाजसेवा आणि मानवतेचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांच्या विशेष कौतुकाचा विषय ठरला. श्री स्वामी समर्थ देवस्थान, रांधे हे अल्पावधीतच भक्तांच्या श्रद्धास्थानाचे केंद्र बनले असून पारनेर तालुक्यासह परिसरातील विविध भागांतून भाविक येथे दर्शनासाठी येत असल्याचे आमदार दाते सर यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी संस्थापक अनिल आवारी व सर्व सेवेकऱ्यांचे विशेष अभिनंदन केले.

यावेळी महाप्रसादाचे आयोजन श्री. भिमाजी घुले, डॉ. संदीप डफळ, श्री. युवराज ढवण, श्री. जितेंद्र राऊत, श्री. शंकर लामखडे, श्री. चंद्रकांत ढवण, श्री. महेंद्र शेटे, श्री. पंढरीनाथ वराळ, श्री. ज्ञानेश्वर निचित, श्री. संतोष ढवण, पत्रकार योगेश खाडे, श्री. दशरथ ढवण तसेच गं.भा. शालूबाई आवारी यांच्या वतीने करण्यात आले होते. महारआरतीनंतर हजारो भाविकांच्या उपस्थितीत महाप्रसादाचा लाभ घेण्यात आला.

यावेळी वसंतराव चेडे, आर. एस. कापसे सर, सुभाष भोसले, विकास पवार, मेजर नरसाळे, मच्छिंद्र टावरे, दत्तात्रय बाबर सर, भास्करशेठ जाधव, कैलास आवारी, सतीश लामखडे, संतोष आवारी, संतोष खडके, दिलीप आवारी, दीपक मावळे, अनिल गाडगे, प्रशांत पवार, सुधीर परंडवाल, प्रतीक कापसे, लहू गागरे, सखाराम भंडारी, रावसाहेब भदे, विठ्ठल आवारी, पोपट आवारी, संदीप गहाणडूले, बाळासाहेब आवारी, गोरख आवारी, रवी पावडे, किसन चौधरी, प्रविण वराळ, दीपक वरखडे, अजित आवारी, सचिन शेंडकर, गणेश क्षीरसागर, नितीन लंके, किशोर कुंभकर्ण यांच्यासह सौ. पुष्पाताई वराळ, सौ. सोनल आवारी, सौ. रेश्मा गलांडे, सौ. वर्षा भोसले, सौ. सारिका सरोदे, सौ. छाया पावडे, सौ. आश्विनी वरखडे, सौ. रेश्मा वराळ, सौ. सीताबाई गहाणडूले, सौ. मीनाक्षी काटे, सौ. जयश्री पावडे, सौ. सुनीता सरोदे, लता टावरे, रेश्मा खडके, चंद्रभागा आवारी, सौ. पमाबाई आवारी, सौ. रुपाली आवारी, सौ. सुरेखा आवारी, सौ. शकुंतला भदे, सुरेखा भंडारी आदींसह हजारो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धर्मवीर संभाजीराजे जयंतीनिमित्त छावा संघटनेचा सामाजिक उपक्रम

## नवनाथ वारकरी शिक्षण संस्थेला किराणा साहित्य भेट

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** धर्मवीर छत्रपती संभाजीराजे यांच्या जयंतीनिमित्त अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत एक अनोखा उपक्रम राबविण्यात आला. निमगाव वाघा येथील नवनाथ वारकरी शिक्षण संस्थेला किराणा साहित्याचे वाटप करून विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्यात आला.

धर्मवीर संभाजीराजे यांच्या विचारांप्रमाणे समाजहिताची भावना जोपासत जयंती उत्सव साजरा व्हावा, या उद्देशाने छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी हा उपक्रम हाती घेतला. संस्थेतील विद्यार्थ्यांना दैनंदिन उपयोगाचे किराणा साहित्य देत सामाजिक जाणिवेचा आदर्श निर्माण करण्यात आला.

यावेळी छावा संघटनेचे युवक आघाडी सचिव पश्चिम महाराष्ट्र दत्ता भाऊ वामन, जिल्हाध्यक्ष सुरेखाताई सांगळे पाटील, बापू ठाणगे, दीपक गहिले, पिंटू पवार, दिलीप गायकवाड, रविकिरण वाघ, मयुर पवार, माधवी दांगट, प्रियंका म्हस्के, अनुराधा सुरर्से, मनिषा भोसले, शामल शिंदे, ज्योती शिंदे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना दत्ताभाऊ वामन म्हणाले की, धर्मवीर छत्रपती संभाजीराजे यांच्या जयंतीनिमित्त होणाऱ्या अनावश्यक व दिखाऊ खर्चाला फाटा देत समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा आमचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक साहित्य देऊन त्यांच्या शिक्षणासाठी हातभार लावणे हीच खरी जयंती साजरी करण्याची भावना व्यक्त करून सामाजिक कार्यातून युवकांनी प्रेरणा घ्यावी अशी भावना व्यक्त केली तर बापू ठाणगे यांनी आभार मानले.

# शनिवारी रंगणार सहावे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन

## स्वागताध्यक्षपदी माधवराव लामखडे, गौरव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ॲड. कृष्णा झावरे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त निमगाव वाघा (ता. नगर) येथे शनिवार, दि. १६ मे रोजी आयोजित करण्यात आलेल्या सहाव्या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी उद्योजक तथा माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच प्रज्ञावंत व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या गौरव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. कृष्णा पंडितराव झावरे यांची निवड करण्यात आल्याची माहिती संमेलनाचे मुख्य संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली.





स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने परिवार मंगल कार्यालय, निमगाव वाघा येथे या साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील साहित्य, संस्कृती, लोकपरंपरा आणि समाजप्रबोधनाचा वारसा जपण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या संमेलनात राज्यभरातील साहित्यिक, कवी, समाजप्रबोधक, अभ्यासक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

ग्रामीण साहित्याला व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, नवोदित लेखक-कवींना प्रोत्साहन देणे तसेच समाजामध्ये वैचारिक जागृती निर्माण करणे हा या साहित्य संमेलनाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. संमेलनात विविध साहित्यिक परिसंवाद, विचारमंथन सत्रे, सामाजिक विषयांवरील चर्चासत्रे आणि काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील अनेक नामांकित कवी व कवयित्री आपल्या कविता सादर करणार असून ग्रामीण संस्कृतीचा ठेवा जपणाऱ्या लोककला आणि साहित्य प्रकारांनाही विशेष स्थान देण्यात आले आहे.

यावेळी छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित पोवाडे, अभंग, प्रेरणादायी कविता आणि सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे त्यांच्या विचारांना अभिवादन करण्यात येणार आहे. समाजप्रबोधन, राष्ट्रभक्ती, स्त्रीशक्ती आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या या महामानवांच्या कार्याचा प्रेरणादायी वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या संमेलनातून करण्यात येणार आहे.

माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे हे कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि साहित्यिक चळवळींना सातत्याने पाठबळ देत असतात. ग्रामीण भागातील सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला असून यापूर्वीही त्यांनी विविध ग्रामीण काव्य व साहित्य संमेलनांमध्ये महत्त्वपूर्ण पदे भूषविली आहेत. साहित्य आणि समाजकार्याची विशेष आवड असलेल्या लामखडे यांच्या नियुक्तीमुळे संमेलनाच्या आयोजनाला अधिक बळ मिळणार असल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली.

तर अहमदनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. कृष्णा पंडितराव झावरे हे कायदे क्षेत्राबरोबरच सामाजिक चळवळींमध्येही सक्रिय योगदान देत आहेत.

# रयत शिक्षण संस्थेत उत्तर विभागाला विशेष प्रतिनिधीत्वाची संधी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–**आशिया खंडातील सर्वात मोठ्या रयत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी माजी केंद्रीय मंत्री मा. शरद पवार यांची पुन्हा एकदा निवड करण्यात आल्याचे व उत्तर विभागाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीचे उत्तर विभागीय कार्यालय व माध्यमिक शिक्षक संघाकडून स्वागत करण्यात आले आहे. तर उत्तर विभागाला विशेष प्रतिनिधीत्वाची संधी मिळाली असल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे.

शिक्षणाची गंगा बहुजनांच्या घराघरात पोहोचविणाऱ्या रयत शिक्षण संस्थेच्या संस्थेच्या उपाध्यक्षपदी अरूण पुंजाजी कडू-पाटील आणि सचिवपदी विकास विश्वासराव देशमुख यांची

रयत शिक्षण संस्था

फेरनिवड करण्यात आली आहे. यासोबतच रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागातून मॅनेजिंग कौन्सिल सदस्य म्हणून ॲड. भगीरथ निवृत्ती शिंदे, श्रीमती मीनाताई माणिकराव जगधने, बाबासाहेब सहादू भोस, संदिप गोरखनाथ वर्पे, सुरेश विठ्ठलराव बोळीज, प्रिं. डॉ. नानासाहेब सूर्यभान गायकवाड, राजेंद्र खंडेराव चांदे यांची निवड झाली आहे.

ना. शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नूतन पदाधिकाऱ्यांच्या कार्यकुशलतेमुळे संस्थेची शैक्षणिक, सामाजिक आणि संघटनात्मक प्रगती अधिक वेगाने होईल, अशी भावना विभागीय अध्यक्ष आशुतोष काळे व विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे यांनी व्यक्त केली आहे.

या निवडीबद्दल अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे यांनी नूतन कार्यकारिणीचे विशेष अभिनंदन केले आहे.उत्तर विभागातील सर्व जनरल बॉडी सदस्य, लाइफ वर्कर, लाइफ मेंबर, सर्व शिक्षक, मुख्याध्यापक आणि रयत हितचिंतकांनी या निवडीचे स्वागत करून नूतन पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# आगामी मान्सूनच्या पार्श्वभूमीवर सर्व यंत्रणांनी संवेदनशील राहून समन्वयाने काम करा- पालकमंत्री

**जिल्हाधिकारी कार्यालयात पाणीटंचाई व मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठक**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील पाणीटंचाई निवारणासाठी सुरू असलेल्या उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबवून नागरिकांना सुरळीत आणि पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून द्यावा. तसेच आगामी मान्सूनच्या पार्श्वभूमीवर सर्व विभागांनी आवश्यक ती पूर्वतयारी वेळेत पूर्ण करून आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवावी. टंचाई निवारण, पूर प्रतिबंधक उपाययोजना, आरोग्य सेवा, वीजपुरवठा, रस्ते दुरुस्ती आणि आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा याबाबत कोणताही हलगर्जीपणा न करता सर्व यंत्रणांनी समन्वयाने व संवेदनशीलपणे काम करण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात टंचाई व मान्सूनपूर्व तयारीच्या आढावा बैठकीत पालकमंत्री डॉ. विखे पाटील बोलत होते. या बैठकीस आमदार विठ्ठल लंघे, आमदार अमोल खताळ, आमदार विक्रमसिंह पाचपुते, जिल्हाधिकारी पंकज आशिया, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच्यासह संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. दूरदृश्यप्रणालीद्वारे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार काशिनाथ दाते, आमदार हेमंत ओगले, आमदार किरण लहामटे, आमदार आशुतोष काळे उपस्थित होते. पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले , ज्या गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे, तेथे पाणीपुरवठा नियमित आणि पारदर्शक पद्धतीने व्हावा. पिण्याच्या पाण्याच्या योजनांमध्ये कोणतीही अडचण निर्माण होणार नाही यासाठी संबंधित विभागांनी सतत समन्वय ठेवावा. जलस्रोतांची उपलब्धता, विहिरींची स्थिती, पाणीपुरवठा योजनांची कार्यक्षमता आणि टँकर व्यवस्थापन याचा नियमित आढावा घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. ते पुढे म्हणाले की, जिल्ह्यातील गावे, वस्त्या, वाड्या आणि तांडे येथे टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असलेल्या ठिकाणी फिरते जलशुद्धीकरण प्रकल्प कार्यान्वित करून नागरिकांना शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यात यावा. गावांमध्ये लोकसंख्येच्या आधारावर पाण्याच्या टाक्या उभारून त्याद्वारेच पाणी वितरण करावे. यामुळे पाण्याचा अपव्यय टळून प्रत्येक नागरिकाला समानतेने पाणी मिळण्यास मदत होईल. टाक्यांची नियमित स्वच्छता करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचे गावनिहाय वेळापत्रक निश्चित करण्यात यावे आणि त्याच वेळापत्रकानुसार पाणी वितरण करण्यात यावे. पाणी वाटपावेळी तलाठी आणि ग्रामसेवक यांची उपस्थिती बंधनकारक करण्यात यावी. पाणी वितरणामध्ये निष्काळजीपणा झाल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी. जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पिण्याचे स्वच्छ आणि शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात. आरोग्य विभागाने प्रत्येक गावातील पाण्याचे नमुने नियमित तपासून त्याचा अहवाल दर आठवड्याला सादर करावा. दूषित पाण्यामुळे उद्भवणाऱ्या साथीच्या आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आरोग्य यंत्रणांनी सज्ज राहावे, अशाही सूचना त्यांनी दिल्या. जिल्ह्यात विविध यंत्रणांमार्फत पाणीपुरवठ्यासंदर्भात सुरू असलेल्या योजनांच्या ठिकाणी जलशुद्धीकरण प्रकल्प कार्यान्वित करण्यात यावेत. नादुरुस्त जलशुद्धीकरण प्रकल्प तातडीने दुरुस्त करून कार्यान्वित करण्यात यावेत. प्रशासनाने नागरिकांच्या तक्रारींना तातडीने प्रतिसाद देऊन संवेदनशीलतेने कार्य करावे. पावसाळ्यात कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास त्यावर तत्काळ नियंत्रण मिळवण्यासाठी विभागांमध्ये प्रभावी समन्वय असणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील सर्व यंत्रणांनी सज्ज राहून नागरिकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने काम करावे, अशा सूचनाही पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी यावेळी दिल्या.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलचा रुग्णसेवेचा महायज्ञ अखंडपणे सुरू आहे - श्रीमती सीमा शेटीया

**आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे पाठ दुखी व मणके विकार तपासणी शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद । ७५ रुग्णांची तपासणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आचार्य आनंदऋषींजींच्या प्रेरणेने हॉस्पिटलमध्ये मोठ्या प्रमाणात सेवेचे कार्य सुरू आहे. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत रुग्णसेवा मिळावी. यासाठी रुग्णसेवेचा महायज्ञ अखंडपणे सुरू आहे. समाजातील गरजू रुग्णांना मोफत व अल्प दरात रुग्णसेवा मिळावी.यासाठी आनंद ऋषीजी हॉस्पिटलच्या मार्फत मोठ्या प्रमाणात आरोग्य शिबिरे घेतले जातात ही कौतुकास्पद बाब आहे.शिबिराच्या माध्यमातून शेटीया परिवाराला रुग्ण सेवेची संधी दिली आहे.आनंदऋषीजी हॉस्पिटलचा रुग्णसेवेचा महायज्ञ अखंडपणे सुरू राहील. असे प्रतिपादन श्रीमती सीमा शेटीया यांनी केले.

आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे पाठ दुखी व मणके विकार तपासणी शिबिराचे आयोजन स्व.लक्ष्मीकांतजी शेटीया यांच्या स्मरणार्थ श्रीमती सीमा शेटीया सीए प्रणेश शेटीया,सीए सौ.सलोनी शेटीया,कु.प्रतीक्षा शेटीया व शेटीया परिवाराच्या वतीने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी अजित शेटीया,निलेश छाजेड, सौ.सारिका छाजेड,सौ. सारिका पारख,तसेच गणेश कांकरिया, गौतम चोरडिया,राजेंद्र तातेड,धन्यकुमार बरमेचा, अमोद बोथरा व मित्र परीवार,जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा,डॉ.प्रकाश कांकरिया,डॉ. वसंत कटारिया, माणकचंद कटारिया,सतीश लोढा,वसंत चोपडा,डॉ.आशिष भंडारी,सुभाष मुनोत,अभय गुगळे,प्रकाश छल्लाणी, शिबिराचे तज्ञ डॉक्टर डॉ.भरत जगताप,डॉ.विशाल शिंदे, डॉ.रोहन धोत्रे,डॉ.श्रीकांत दलाल आदी उपस्थित होते.

सीए सौ.सलोनी शेटीया म्हणाले,शेटीया परिवाराला आरोग्य शिबिराच्या माध्यमातून खारीचा वाटा उचलण्याची संधी मिळाली आहे.हे शेटीया परिवाराचे भाग्य समजते. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये गरजू रुग्णांना मोफत व अल्प दरात उपचार करून त्यांना बरे केले जाते.यामुळे आनंदऋषीजी हॉस्पिटलची कीर्ती सर्व दूर पसरली आहे.

गणेश कांकरीया म्हणाले, आमचे मित्र स्वर्गीय लक्ष्मीकांत शेटीया यांचे सामाजिक कार्यात नेहमीच योगदान लाभत होते. जीवदया ग्रुपच्या माध्यमातूनही त्यांनी गोसेवेचे कार्य केले आहे. शेटीया परिवाराने त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त आरोग्य शिबिराचे आयोजन करून गरजवंत रुग्णांसाठी चांगला उपक्रम केला आहे. स्वर्गीय लक्ष्मीकांतजी शेटीया यांना स्मृति दिनानिमित्त मित्र परिवाराच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

डॉ.भरत जगताप म्हणाले, पूर्वी समाजामध्ये मनके विकाराच्या ऑपरेशनमुळे पायाची ताकद जाते,रुग्ण दगावतो अशा प्रकारची भीती होती.परंतु आता प्रगत तंत्रज्ञानामुळे व उपलब्ध सोयी सुविधांमुळे दुर्बिणीद्वारे चांगल्या पद्धतीने शस्त्रक्रिया होत असल्याने रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा.मणके विकार संबंधी हॉस्पिटलमध्ये पूर्णवेळ वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्यात आली आहे.येथे उपचारासाठी आलेल्या रुग्णांना महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ घेता येईल.या शिबिराचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा.असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

संतोष बोथरा म्हणाले, स्व.लक्ष्मीकांत शेटीया यांचे सामाजिक कार्यात मोठे योगदान होते.जिथे कमी तिथे आम्ही याप्रमाणे समाजकार्यात नेहमी अग्रेसर असा शेटीया परिवार आहे.शेटीया परिवाराने आरोग्य शिबिराच्या माध्यमातून स्मृती जपण्याचे कार्य केले आहे.स्मृतिदिन कसा साजरा करावा याचा चांगला पायंडा शेटीया परिवाराने पाडला आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये सेवाभावी वृत्तीने आरोग्य सेवेचे कार्य होत आहे. यासाठी समाजातील अनेक दानशूर व्यक्तींचे योगदान लाभत असते.समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत रुग्णसेवा मिळावी हे आचार्य आनंदऋषीजींचे स्वप्न साकारण्यासाठी जैन सोशल फेडरेशनचे सर्व सदस्य अत्यंत तळमळीने कार्य करीत आहे.

डॉ.आशिष भंडारी यांनी सूत्रसंचालन केले तर प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले.या शिबिरात ७५ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

# मानव जीवनातील प्रत्येक क्षण मानवता आणि भक्तीभावासाठी समर्पित असावा - सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज

**निरंकारी मिशनच्या वतीने बाबा हरदेवसिंहजींना श्रद्धासुमन अर्पण करित 'समर्पण दिवस' साजरा**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्मिक चेतनेने भारावलेल्या दिव्य वातावरणात संत निरंकारी मिशनतर्फे युगदृष्टा बाबा हरदेवसिंहजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त संत निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा येथे भावपूर्ण संत समागमाचे आयोजन करण्यातआले. सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज तसेच निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन सान्निध्यात पार पडलेल्या या समागमात देश-विदेशातील लाखो श्रद्धाळूंनी सहभागी होत सतगुरुंच्या अमृतमयी वचनांचा लाभ घेत आत्मिक शांती, आनंद आणि दिव्य प्रेरणेचा अनुभव घेतला.

यावेळी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी आपल्या आशीर्वचनांत सांगितले की, बाबा हरदेवसिंहजी यांचे संपूर्ण जीवन मानवता, सेवा आणि प्रेमाभक्तीचे जिवंत उदाहरण होते. मानवी जीवनातील प्रत्येक क्षण अर्थपूर्ण ठरावा आणि प्रत्येक कृतीतून करुणा, मानवता व सद्भावना प्रकट व्हावी, हीच त्यांची शिकवण होती. प्रत्येकाने आपल्या अंत:करणात मानवी मूल्ये जोपासून निराकाराच्या आधाराने उद्देशपूर्ण जीवन जगावे, असा संदेश त्यांनी दिला.

एखाद्याच्या आयुष्यात वेदना, दु:ख किंवा संघर्ष असेल, तर त्यात भर घालणे नव्हे, तर प्रेम, संवेदनशीलता आणि सहकार्याच्या माध्यमातून त्याला आधार देणे, हेच खरे मानवी कर्तव्य आहे,'' असे त्या म्हणाल्या. नात्यांमध्ये प्रेम, आपुलकी आणि समर्पणाची वीण अधिक दृढ करणारे जीवनच खऱ्या अर्थाने मानवतेचे दर्शन घडवते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मंडळाच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने मिस्कीनरोड स्थित संत निरंकारी सत्संग भवन येथे छ. संभाजीनगर येथील आ. कन्हैयालाल डेबरा यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्संगचा कार्यक्रम पार पडला यात अनेक वक्त्यांनी विचार,गीत, कवितांच्या माध्यमातून बाबाजींच्या प्रेरणादायी शिकवणुकिंचे स्मरण करित श्रद्धासुमन अर्पित केले.असेच सत्संग कार्यक्रम झोन ३६अ मधील सर्व शाखां मध्ये मोठ्या उत्साहात, श्रद्धाभावाने पार पडले असल्याची माहिती झोनल इन्चार्ज हरिष खुबचंदानी यांनी दिली.

बाबा हरदेवसिंहजींची प्रेरणा आजही लाखो श्रद्धाळूंच्या हृदयात तेवढ्याच तेजाने जिवंत आहे. सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज त्यांच्या शिकवणीचा वारसा पुढे नेत सेवा, समर्पण आणि सद्भावनेचा प्रकाश जगभर पसरवत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मानवता, एकता आणि बंधुभावाचा संदेश सातत्याने समाजापर्यंत पोहोचत आहे.

# अहिल्यानगर महानगरपालिकेत पेन्शन असोसिएशनचे धरणे

**उतार वयात औषधोपचारासाठी पेन्शन देता का पेन्शन?**
**दोन महिन्यांचे कर्मचाऱ्यांचे वेतन व पेन्शन देण्याचे आयुक्तांचे आश्वासन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महानगरपालिकेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मार्च आणि एप्रिल या दोन महिन्यांची रखडलेली पेन्शन, सहाव्या वेतन आयोगातील उर्वरित नऊ हप्ते तसेच इतर प्रलंबित आर्थिक मागण्या तात्काळ मंजूर करण्यात याव्यात, या मागणीसाठी महानगरपालिका पेन्शनर असोसिएशनच्या वतीने महापालिकेत धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान महापालिका प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

महापालिका पेन्शनर असोसिएशनचे राज्याध्यक्ष एन. एम. पवळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. यावेळी संघटनेचे पदाधिकारी, सेवानिवृत्त कर्मचारी आणि कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनकर्त्यांनी महापालिकेच्या आर्थिक नियोजनातील ढिसाळ कारभारामुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना नियमित पेन्शनपासून वंचित राहावे लागत असल्याचा आरोप केला.

आंदोलनादरम्यान आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आले. निवेदन स्वीकारताना आयुक्तांनी कामगारांचे दोन महिन्यांचे वेतन, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची पेन्शन तसेच सहाव्या वेतन आयोगातील फरकाची रक्कम देण्याचे आश्वासन दिले. प्रशासनाकडून सकारात्मक भूमिका घेतल्याने आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले.

यावेळी एन. एम. पवळे, एन. एम. देशमुख आणि कामगार नेते कॉ. अनंत लोखंडे यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर ठाम भूमिका मांडली. ''महापालिकेकडून वेळेवर पेन्शन न मिळाल्याने अनेक निवृत्त कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. काही जण उपचाराअभावी मृत्युमुखी पडले आहेत,'' असा गंभीर आरोप यावेळी करण्यात आला. आंदोलनाच्या प्रारंभी दिवंगत सभासदांना श्रद्धांजली अर्पण करून आंदोलनास सुरुवात करण्यात आली.

आंदोलनकर्त्यांनी प्रशासनासमोर अनेक मागण्या मांडल्या. मागील दोन महिन्यांची थकीत पेन्शन तात्काळ अदा करावी, प्रत्येक महिन्याची पेन्शन एक तारखेलाच जमा करण्यात यावी, जीएसटी अनुदान महिन्याच्या पहिल्या तारखेपूर्वी उपलब्ध करून द्यावे, सहाव्या वेतन आयोगाची राहिलेली थकबाकी तत्काळ वितरित करावी तसेच महानगरपालिकेने बंद केलेली पेन्शन विक्री योजना पुन्हा सुरू करावी, अशा मागण्यांचा निवेदनात समावेश होता.

या आंदोलनात मधुकर खताळ, एच. आर. सय्यद, द्वारका किंगर, संजय मुठाळ, बबन काळे, ज्ञानेश्वर धिरडे, किशोर पाखळे, दत्तात्रय व्यापारी, वसंत शिंदे, रंगनाथ गावडे, दिलीप पाठक, रामचंद्र कदम, टेकाळे, संजय पटेकर, बबन खरमाळे, रफिक शेख, एस. एम. बोरगे, ठका कराळे, मोहन खपके, राजेंद्र सारसर, पांडुरंग गाडे, इम्तियाज शेख, अनवर शेख यांच्यासह अनेक सेवानिवृत्त कर्मचारी सहभागी झाले होते.

# एलसीबीचे अवैध धंद्यांवर छापे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने पोलिस अधीक्षक यांच्या मार्गदर्शना खाली विशेष मोहीम हाती घेतली असून, १२ मे रोजी विविध ठिकाणी छापे टाकून कारवाई केली. या कारवाईत पाच अवैध दारू विक्रेते आणि एका जुगार अड्ड्यावर धाड टाकण्यात आली असून एकूण ३७,९८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात अवैध धंदे सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या चार पथकांनी श्रीगोंदा, पारनेर आणि भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही कारवाई केली. श्रीगोंदा परिसरात दोन ठिकाणी गावठी दारू विक्री करणाऱ्यांवर तर एकाठिकाणी जुगार खेळणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. पारनेरमध्ये पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, व त्यांच्या पथकाने एका दारू विक्रेत्याला मुद्देमालासह पकडण्यात आले, तर भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन कारवाया करून २४,४०० रुपयांचा माल हस्तगत केला. या प्रकरणी पोलिसांनी संबंधित सहा आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला असून त्यांच्याकडील मुद्देमाल जप्त केला आहे. जिल्ह्यामध्ये कोठेही असे अवैध व्यवसाय सुरू असल्यास नागरिकांनी तातडीने पोलीस नियंत्रण कक्ष किंवा स्थानिक गुन्हे शाखेच्या क्रमांकावर माहिती द्यावी, असे आवाहन पोलिस निरीक्षक. किरणकुमार कबाडी यांनी केले आहे. या कारवाईने अवैध धंद्यावाल्यांचे धाबे दणाणले आहेत.

(पान १ वरून)

## बोगस बियाणे, खतांचा काळाबाजार करणाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल करा - पालकमंत्री

आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी. शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी गट व 'शेतकरी शास्त्रज्ञ मंच'च्या माध्यमातून कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यात यावा, असे त्यांनी नमूद केले.

राज्याबाहेरून, विशेषत: सीमावर्ती भागांतून येणाऱ्या बोगस बियाण्यांच्या विक्रीला आळा घालण्यासाठी पोलिसांच्या मदतीने तपासणी नाके उभारण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. कापूस, सोयाबीन व रब्बी ज्वारी बियाण्यांतील फसवणुकीची गंभीर दखल घेत अनधिकृत विक्रेत्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. खतांच्या वाहतुकीसाठी शेतकऱ्यांकडून जादा भाडे आकारले जात असल्याच्या तक्रारींची दखल घेत 'राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स' कंपनीच्या १०० किलोमीटरपर्यंतच्या मोफत वाहतूक सुविधेचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी कृषी अधिकाऱ्यांनी वैयक्तिक लक्ष द्यावे, असे निर्देशही पालकमंत्र्यांनी दिले.

प्रास्ताविकात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी सांगितले की, जिल्ह्यात खते व बियाण्यांची कृत्रिम टंचाई आणि गैरप्रकार रोखण्यासाठी गुणवत्ता नियंत्रणावर विशेष भर देण्यात आला आहे. आतापर्यंत ११ हजार तपासण्या करून १०३ कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले असून, शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांविरोधात दोन पोलीस केसेस व १९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जागतिक परिस्थितीमुळे युरिया व डीएपी खतांचा संभाव्य तुटवडा लक्षात घेऊन ५ हजार ४०० मेट्रिक टन खताचा राखीव साठा निर्माण करण्यात आला असून त्यापैकी ७५० मेट्रिक टन साठा सध्या उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी दिली. अल-निनोच्या पार्श्वभूमीवर कमी पावसाचा अंदाज लक्षात घेऊन कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांबाबत जनजागृती करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

बैठकीत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी सादरीकरण केले. यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते कृषी विभागाच्या विविध योजनांच्या माहितीपुस्तिकेचे व संतुलित खत वापर जनजागृती अभियानाच्या पोस्टरचे प्रकाशन करण्यात आले.

## कांद्याच्या दरासाठी राष्ट्रवादीचा रास्ता रोको

या आंदोलनात राष्ट्रवादीचे नेते दीपक लंके, महिला आघाडीच्या नेत्या सोनिया राजदेव, नीलेश लंके प्रतिष्ठानचे तालुकाध्यक्ष सतीश भालेकर, सरपंच प्रकाश गाजरे, उपसरपंच रामभाऊ तराळ, ज्येष्ठ नेते शशिकांत आंधळे, शहराध्यक्ष संदीप मत, लखन ठाणगे, जालिंदर लंके, विक्रम काळे, विश्वास शेटे, सरपंच शिवाजी निमसे, पोपट गुंड, संदीप ठाणगे, सरपंच अभिजित झावरे, प्रकाश राजदेव, भाऊसाहेब चौधरी, भानुदास आग्रे, बाळासाहेब चिकणे, संतोष चिकणे, साहेबराव चिकणे, शिवराम चिकणे, रामभाऊ थोरात, सरपंच बापू ठुबे, आयुब हवलदार, गंगाराम चिकणे, रामदास साळवे, बापू नरड, पोपट नरड, राजेंद्र शेरकर, विकास दगाबाज, जयवंत वाळुंज यांच्यासह शेकडो शेतकरी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

दरम्यान, आंदोलनादरम्यान वाहतूक कोंडीत अडकलेल्या एका रुग्णवाहिकेला आंदोलनकर्त्यांनी तत्काळ मार्ग करून दिल्याने आंदोलनस्थळी माणुसकीचे दर्शन घडल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## सामाजिक बांधिलकीतून धर्मवीरांना मानाचा मुजरा

फाउंडेशन चे ट्रस्ट मेंबर संदीप नवसुपे मनोज सोनवणे जिल्हाध्यक्ष अशोक गाडे, निलेश सुंबे, दरेकर काका, शशिकांत भांबरे, संजयजी शिंदे, श्रीपाद दगडे, भाग्येश सव्वाशे, सिद्धार्थ पानसरे, बालाजी काळे, भरत सुंबे, अभय शेडगे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.धर्मासाठी जगणाऱ्या आणि धर्मासाठीच बलिदान देणाऱ्या त्या महान राजाला अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशनचा भावपूर्ण प्रणाम!

## आधी भूमिपूजन, नंतर कर्जाचा कटोरा घेऊन मनपा बँकांच्या दारात - किरण काळे

आहे ?, हे आयुक्तांनी एकदाच नगरकरांना सांगून टाकावं असं आवाहन काळेंनी केल आहे. कोणी शहराला मातीत गाडायला निघाल असेल तर ठाकरे शिवसेना ते होऊ देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे.

**खोटारडेपणाचे फलक तात्काळ हटवा :**

९.३४ कोटी निधी आणल्याचा दावा करणारे सत्ताधाऱ्यांचे फलक अजूनही बाजारपेठेत झळकत आहेत. ही सरळ नगरकरांची दिशाभूल आहे. सत्ताधाऱ्यांच्या खोटारडेपणाच्या पाऊलखुणा असलेले ते फलक तात्काळ हटवावेत,'' अशी मागणी किरण काळे यांनी केली आहे.